


श्री गणेश चतुर्थीच्या सर्व गणेश भक्तांना मंगलमय शुभेच्छा!

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com





वर्ष : ०५ | अंक : १२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.२७ ऑगस्ट २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## महाबळेश्वरच्या पावसाने केला दोनशे इंचाचा टप्पा पार



**अक्षराज : रियाज मुजावर**
**दि.२६, महाबळेश्वर :** महाबळेश्वर हे जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ असून ब्रिटीश काळापासून महाबळेश्वरचा गिरीस्थान हा नावलौकीक आज ही कायम आहे पावसाचे माहेर घर म्हणून प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वर येथे पावसाने दि. २६ ऑगस्ट २०२५ अखेर ( पडलेला पाउस ५१७७. ५० मी. मी./ एकूण इंच २०३.८३९) पाऊस झाला असून २०० इंच पावसाचा टप्पा पार करत पावसाने द्विशतक पार केले आहे रिमझिम पाऊस बरसत असून वातावरण अल्हादायक होऊन वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला आहे सर्वत्र धुके पसरले आहे भोवतालचा परिसर जमलय झाला असून निर्सग हिरवागार झाला आहे वेण्णा तलाव पुर्ण क्षमतेने भरला आहे छोटे मोठे धबधबे प्रवाहित झाले असून प्रसिद्ध असा लिंगमळा धबधबा फेसाळलेल्या पांढऱ्या शुभ्र पाण्याने प्रवाहित झालेला असून नयनरम्य दृश्य पहावयास मिळत आहे सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या महाबळेश्वरमध्ये रिमझिम पाऊस सुरू असून संपूर्ण भोवतालचा निसर्ग मनोहर हिरव्यागार वनराईने नटला आहे पाऊस ,थंडगार हवा , धुक्याची चादर असे दृश्य महाबळेश्वर मध्ये पहायला मिळत असून. हे वातावरण तसेच डोंगरदऱ्या , पॉईट, धबधबे, वेण्णा लेक पर्यटकांना आकर्षित करताना दिसत आहेत पर्यटक या सुंदर, नयनरम्य अल्हादायक वातावरणाचा आनंद घेण्याकरिता सहपरिवार महाबळेश्वला भेट देताना दिसत आहेत. परंतु पांचगणी महाबळेश्वर रस्त्याची झालेली दुरवस्था जागो जागी पडलेल्या खड्डयांमुळे प्रवासात स्थानिक तसेच पर्यटकांना तरेवरची कसरत करावी लागत असून अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे तरी स्थानिक प्रशासनाने यावर लवकारात लवकर उपाय योजना करून खड्डेमय झालेल्या महाबळेश्वर पांचगणी रस्त्याची दुरुस्ती करून खडतर होणारा प्रवास सुखकर करावा अशी मागणी पर्यटक व स्थानिकांकडून केली जात आहे.

## पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून मूकबधिर मुलाचा मृत्यू



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, काटोल (नागपूर) :** काटोल तालुक्यातील खानगाव पारधी बेड्यावर मंगळवारी सकाळी घडलेली घटना परिसराला हादरवून गेली. नगरपरिषदेच्या डम्पिंग साइटवरील पावसाच्या पाण्याने भरलेल्या खड्ड्यात बुडून १२ वर्षीय मूकबधिर मुलाचा विराट राणा पवार याचा मृत्यू झाला आहे. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, स्थानिकांनी प्रशासनावर तीव्र संताप व्यक्त केला आहे.काटोल नगरपरिषदेने कचरा डम्पिंगसाठी मोठमोठे खड्डे खोदले होते. मात्र, त्यांची सुरक्षितता किंवा योग्य देखरेख केली नव्हती. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आणि परिसर धोकादायक बनला. याच खड्ड्यात पडून विराटचा जीव गेला. अपंगत्वामुळे आधीच संघर्षमय जीवन जगणाऱ्या या मुलाच्या मृत्यूने कुटुंबाचे दुःख पाहून संपूर्ण परिसर सुन्न झाला होता. आई माधुरी पवार यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण समाजानेही या दुर्घटनेबद्दल तीव्र संपात व्यक्त केला आहे. याप्रकरणी स्थानिक रहिवाशांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून या खड्ड्यांना बुजवण्याची मागणी केली जात आहे. आमदार, मंत्री आणि प्रशासनाकडे वारंवार निवेदन दिले, पण फक्त आश्वासने मिळाली. अखेर या निष्काळजीपणामुळे एका निरागस जीवाचा बळी गेला. शुभांगी राजपूत, तरामती रेवतकर, हरिचंद्र राजपूत यांच्यासह नागरिकांनी नगरपरिषद आणि डम्पिंग कंपनीवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. याप्रकणाचा प्राथमिक तपास सुरू असला तरी पारधी समाजाचा आग्रह आहे की, ही केवळ चौकशीपुरती मर्यादित राहू नये. दोषींना शिक्षा झाली पाहिजे आणि धोकादायक खड्डे तात्काळ बुजवले गेले पाहिजेत. दरम्यान, नगरपरिषद आणि संबंधित कंपनीकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळालेली नाही. मात्र, या घटनेने स्थानिक प्रशासनाच्या निष्काळजीपणावर गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विराटचा मृत्यू हा फक्त अपघात नसून, व्यवस्थेच्या त्रुटींचे ठळक उदाहरण ठरला आहे, असं म्हणत परिसरातील नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

## गणेश मूर्ती विक्रेत्याकडून ग्राहकांची फसवणूक...




**अक्षराज : विश्वनाथ शेनॉय**
**दि.२६, डोंबिवली :** डोंबिवली पश्चिम येथील आनंदी कला केंद्र, चिनाल ग्राउंड परिसरातील गणेश मूर्ती विक्रेते प्रफुल परशुराम तांबडे यांच्याविरोधात ग्राहकांची फसवणूक केल्याप्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार, तांबडे यांनी गणेश मूर्तीसाठी आगाऊ १,५०१ रुपये रक्कम घेतली होती. ग्राहकाने ३,५०० रुपये किंमतीची मूर्ती बुक केली होती; मात्र मूर्ती पूर्ण न करता विक्रेत्याने रक्कमेचा अपहार करून पलायन केले. केवळ एका ग्राहकालाच नव्हे तर इतर अनेक ग्राहकांचीही अशीच फसवणूक झाल्याची माहिती पोलिसांकडे आली आहे.

या प्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ४५८/२०२५, कलम ३१८(४), ३१८(२) भारतीय न्याय संहिता अंतर्गत दाखल करण्यात आला आहे. सध्या आरोपीचा शोध सुरू असून, पुढील तपास सुरू आहे.

# खळबळजनक ! नांदेडमध्ये दुहेरी हत्याकांड उघडकीस !!

### उमरी पोलिसात गुन्हा दाखल, ३ आरोपी अटक



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**
**दि.२६, नांदेड :** उमरी तालुक्यांतील करकाळा शिवारात प्रेमप्रकरणातुन अविवाहित तरुण व विवाहित युवतीची जबर मारहाण करुन हातपाय बांधुन विहिरीत फेकुन हत्या केल्याची घटना दिं.२५ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ माजली आहे.

## ...आणि असे घडले आणखी एक सैराट प्रकरण


सविस्तर वृत्त असे की, मयत मुलाच्या वडिलांनी उमरी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत असे नमूद केले की, माझा मयत मुलगा लखन बालाजी भंडारे व गावातील संजिवनी मारोती सुरणे यांच्यात गेल्या २ वर्षांपासून प्रेम प्रकरण होते.

सदरचे प्रकरण गावात समजल्याने गावातील प्रतिष्ठित लोक व मुलगा व मुलगी यांना समजावून सांगितले व प्रकरण गावात मिटविले मारोती लक्ष्मण सुरणे यांनी त्यांची मुलगी संजिवनी हिचे लग्न गोळेगाव येथे करुन दिले. पण त्यांचे प्रेम प्रकरण आमच्या लक्षात आले नाही. पण प्रेम चालूच होते.

दि.२५ ऑगस्ट रोजी आमच्या भावकीतील व्यक्तींचे निधन झाल्याने आम्ही गावात होतो. दुपारच्या सुमारास मला लखनच्या मित्राचा फोन आला की, तुमचा मुलगा गोळेगाव येथे संजिवनीच्या घरी गेला व त्या दोघांना तीच्या सासरच्या लोकांनी पकडून ठेवले व संजिवनीच्या वडिलांना बोलावले आहे. तु माझ्या वडिलांना व नातेवाईकांना सांग असे लखन याने त्याच्या मित्रांना सांगितले आहे. मी मौत करुन जाणारच होतो, तो पर्यंत माझ्या भावकीतील लोकांना गोळेगाव येथे पाठविले होते. त्यांना फोन करुन विचारले असता त्यांनी सांगितले की, लखन व संजिवनी चे हात पाय बांधून गोळेगाव येथून बोरजुन्नीकडे जाणाऱ्या पाऊलवाटेने संजिवनीचे वडील मारोती लक्ष्मण सुरणे, चुलता माधव लक्ष्मण सुरणे, आजोबा लक्ष्मण पिराजी सुरणे या तिघांनी मिळून माझा मुलगा लखन व त्याची प्रेयसी संजीवनीला वाटेतच मारहाण करुन ठार केले व करकाळा शिवारांतील शेतात विहिरीत हातपाय बांधून फेकुन दिले असे मुलाच्या वडिलांनी उमरी पोलीसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आले.

बालाजी भंडारे यांच्या तक्रारीवरुन आरोपी मुलीचे वडील मारोती लक्ष्मण सुरणे, चुलता माधव लक्ष्मण सुरणे, आजोबा लक्ष्मण पिराजी सुरणे विरूद्ध भारतीय न्याय संहिता, व अनुसूचीत जाती आणी अनसुचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम नुसार कलम १०३(१),३(५),३(२)(५)नुसार गुन्हा दाखल करुन आरोपींना ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी अप्पर पोलीस अधिक्षक अर्चना पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी दशरथ पाटील, पोलीस अधिकारी अंकुश माने यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी सचिन आरमाळ हे पुढील तपास करित आहे.

## पुण्यातील पुरंदर विमानतळाबाबत मोठी अपडेट...



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२६, पुणे :** पुरंदर येथील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पहिल्या दिवशी सात गावांतील ७६० शेतकऱ्यांनी ११०० एकर जागेची संमतीपत्रे जिल्हा प्रशासनाकडे सोमवारी सादर केली. पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनाला विरोध होत असताना एकाच दिवसात विमानतळासाठी लागणाऱ्या जागेच्या जवळपास ४०टक्के जागा जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आली आहे.

भूसंपादनासाठी संमती पत्र स्वीकारण्यास जिल्हा प्रशासनाकडून सोमवारी सुरुवात झाली. २१ दिवसांच्या या मुदतीत संमती देणाऱ्या शेतकऱ्यांना विकसित भुखंडासह चारपट मोबदला देण्यात येणार आहे. पुरंदर तालुक्यातील सात गावांतील दोन हजार ६७३ हेक्टर जागा प्रस्तावित विमानतळासाठी निश्चित करण्यात आली. मात्र, विरोधामुळे सरकारने एक हजार २८५ हेक्टर भूसंपादन करण्याचे निश्चित केले आहे.

'पहिल्या दिवशी सात गावांतील ७६० जागा मालकांनी एक हजार ७० एकर जागेसंदर्भातील संमती पत्रे जिल्हा प्रशासनाकडे सादर केली आहेत. पारगावमधून सर्वाधिक ३२० जागा मालकांनी संमतीपत्र दिले आहे. संमतीपत्र दिलेल्या जागा मालकांचा परतावा निश्चित झाला आहे,' असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सोमवारी सांगितले.

**येथे सादर करा संमतीपत्र...**

भूसंपादनासाठी संमती पत्र देण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, सासवड, कुंभारवळण रस्ता, उपजिल्हाधिकारी भूसंपादन अधिकारी क्र. १, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, बी-विंग पहिला मजला, उपजिल्हाधिकारी भूसंपादन अधिकारी क्र. ३, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे ए- विंग पहिला मजला या कार्यालयांत सकाळी १० ते ५ या वेळेत संमती पत्र स्वीकारण्यात येतील.

जमीनमालकांना स्वतःच्या जमिनीबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे. जागामालकांनी वेळेत संमतीपत्र सादर करून आपला परतावा निश्चित करून घ्यावा. संमतीपत्रे सादर करू नये, यासाठी कोणी दबाव आणत असेल, तर त्यांच्यावर प्रशासनामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असं पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले.

## मांजराचे पाणी नियोजनबध्द पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहच करू...

### खा.बजरंग सोनवणे यांचे प्रतिपादन, जलपुजन कार्यक्रमाला शेतकऱ्यांची गर्दी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**
**दि.२६, बीड :**
शेतीसाठी पाणी आवश्यक असते. यावर्षी मांजरा धरण वेळेत पुर्णक्षमतेने भरले असून भविष्यात मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असे प्रतिपादन खा.बजरंग सोनवणे यांनी केले.

केज, अंबाजोगाई, धारूर, लातूर, कळंब या शहरासह ६१ गावांची तहान भागवणारे व मांजरा पट्ट्यातील पाच तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आणणारे केज तालुक्यातील धनेगाव येथील मांजरा धरण १०० टक्के भरले आहे. दि.२६ रोजी सकाळी १० वाजता खा.बजरंग सोनवणे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आले. जलपूजन प्रसंगी माजी आमदार पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, नरेंद्र काळे, प्रकल्प अधिकारी वर्ग, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच, चेअरमन तसेच मोठ्या



संख्येने शेतकरी बांधव उपस्थित होते. मांजरा धरण हे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आयुष्याशी, शेतीशी आणि उपजीविकेशी घट्ट जोडलेले महत्त्वाचे धरण आहे. या धरणामुळे परिसरातील हजारो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येते. दरवर्षी शेतकऱ्यांची पिकांची आशा या धरणाच्या पाण्यावरच अवलंबून असते. यंदा धरण पूर्ण क्षमतेने ऑगस्ट महिन्यातच भरल्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि दिलासा दिसून येत आहे. मांजरा धरणाचे पाणी नियोजनबद्ध पद्धतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आणि परिसराच्या विकासासाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

मांजरा धरणातून लातूर शहर, लातूर औद्योगिक वसाहत, केज, अंबाजोगाई, धारूर, कळंब या शहरासह ६१ गावे मांजरा धरणातील पाणी पुरवठ्यावर निर्भर असतात. मांजरा धरण पिण्याचे पाण्याबरोबर शेती पिकांना लागणाऱ्या पाण्यासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्या अंतर्गत बीड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यातील ७३ गावातील १८ हजार २२३ हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली येते. डावा कालवा ९० कि.मी. अंतराचा आहे. त्यातून १०,५५९ हेक्टर शेती तर, उजवा कालवा ७८ कि.मी.चा असून त्याअंतर्गत ७६६५ हेक्टर शेती सिंचनाखाली येते. खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामासाठी सरासरी १८५ दलघमी पाण्याचा वापर होते. याशिवाय केज व कळंब तालुक्यातील २७ गावातील शेतकऱ्यांना मांजरा धरणाच्या बॅकवॉटर पाण्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष लाभ होतो, अशी माहिती यावेळी अधिकाऱ्यांनी उपस्थितांना दिली.

# संपादकीय

## अजरामर पार्श्वगायक मुकेश

आज २७ ऑगस्ट, हिंदी चित्रपट सृष्टीतील अजरामर पार्श्वगायक मुकेश यांचा आज स्मृतिदिन. २२ जुलै १९२३ रोजी मुकेश यांचा जन्म झाला. मुकेश यांचे संपूर्ण नाव मुकेश चंद माथूर असे होते. दिल्लीतील दारियागंज आणि चांदणी चौकात त्यांचे बालपण गेले. त्यांच्या वडिलांचे नाव जोरावर चंद माथूर असे होते ते इंजिनिअर होते तर आई राणी या गृहिणी होत्या. मुकेश यांना बालपणापासून संगीताची आवड होती. त्याकाळातील प्रख्यात गायक कुंदनलाल सहगल यांचे ते प्रशंसक होते. त्यांनाही कुंदनलाल सहगल यांच्याप्रमाणे अभिनेता व गायक व्हायचे होते त्यासाठी त्यांनी लहान वयातच त्यांची संगीताचे प्राथमिक धडे गिरवले. त्याकाळातील गाजलेले अभिनेते मोतीलाल यांनी मुकेश यांना त्यांच्या दूरच्या बहिणीच्या लग्नात गाताना पाहिले. मुकेश यांचा आवाज ऐकता क्षणीच ते त्यांच्या आवाजाच्या प्रेमात पडले. एक दिवस हा आवाज हिंदी चित्रपट सृष्टिचा आवाज बनेल असे ते त्यांच्या आई वडिलांना म्हणाले. त्यांनी मुकेश यांना मुंबईत आणले आणि गायक पंडित जगन्नाथ यांच्याकडून गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेण्यास सांगितले. त्यांनीही गायनाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण घेतले. या दरम्यान त्यांना काही चित्रपटात अभिनयाच्या ऑफर्स आल्या. मुकेश यांचा राजबिंडा चेहरा आणि स्मितहास्य यामुळे त्यांना थेट नायकाच्या भूमिका मिळाल्या. १९४१ साली निर्दोष या चित्रपटात त्यांनी पहिल्यांदा अभिनय केला. त्यानंतर चार पाच चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या मात्र त्यांनी अभिनय केलेले चित्रपट काही विशेष चालले नाही त्यामुळे नायक बनण्याचे आपले स्वप्न बाजूला ठेवून त्यांनी गायनावर लक्ष केंद्रित केले. गायक म्हणून मुकेश यांना पहिला ब्रेक मिळाला तो १९४५ साली आलेल्या पहिली नजर या चित्रपटात. या चित्रपटात त्यांनी गायलेले दिल जलता है तो जलने दो हे गीत खूप लोकप्रिय झाले. या गीतामुळे चित्रपट सृष्टित त्यांची ओळख निर्माण झाली. या गाण्यावर कुंदनलाल सहगल यांच्या शैलीचा प्रभाव होता. १९५८ साली आलेल्या यहुदी या चित्रपटातील ये मेरा दिवानापन है हे गाणे देखील खूप गाजले या गाण्याद्वारे त्यांनी स्वतःची वेगळी शैली निर्माण केली आणि कुंदनलाल सहगल यांच्या प्रभावातून ते बाहेर पडले. त्यानंतर हिंदी चित्रपट सृष्टित मुकेश युग सुरू झाले. त्यांनी अनुनासिक शैलीत गायलेले गाणे हिट होऊ लागले. मेला आणि अंदाज या चित्रपटात त्यांनी गायलेले सर्व गाणी लोकप्रिय झाले. अंदाज हिट झाल्यानंतर मुकेश रणजित नावाच्या स्टुडिओत गायनाचा रियाज करीत होते तेंव्हा तिथे एक देखणा तरुण आला आणि म्हणाला किती भावनाप्रधान आहे तुझा आवाज. मला तुझा आवाज खूप आवडतो. तो तरुण होता राज कपूर. पुढे राज कपूर आणि मुकेश हे हिंदी चित्रपट सृष्टीतील यशाचे समीकरण बनले. या जोडीने अनेक हिट गाणी दिले. आग, आवरा, श्री ४२०, बरसात, परवरिश, अनाडी, संगम, मेरा नाम जोकर या आर के बॅनरच्या चित्रपटातील मुकेश यांनी गायलेली सर्व गाणी गाजली. राज कपूर यांचा आवाज अशीच मुकेश यांची ओळख निर्माण झाली. राज कपूर यांच्या सत्यम शिवम सुंदरम या चित्रपटातल्या गाण्याचे रेकॉर्डिंग करून ते अमेरिकेला गेले होते. डेट्रॉय मिशिगन मध्ये २७ ऑगस्ट १९७६ रोजी ते लवकर उठून अंघोळीसाठी गेले असता अचानक त्यांच्या छातीत कळ आली आणि त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्या निधनानंत राज कपूर यांनी आज माझा आवाज कायमचा हरपला! अशी प्रतिक्रिया दिली. मुकेश यांनी तीन दशकांहून अधिक काळ आपल्या अनोख्या गायन शैलीने रसिकांवर मोहिनी घातली. मुकेश यांचा दर्दभरा आवाज रसिकांच्या मनावर कायमचा कोरला गेला आज इतक्या वर्षानीही त्यांचा दर्दभरा आवाज रसिकांना मोहित करतो. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. रजनिगंधा या चित्रपटासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला तर चार वेळा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला मात्र ते रसिकांच्या मनात त्यांचे जे स्थान आहे त्याला सर्व पुरस्काराहून श्रेष्ठ आहे मानत. त्यांच्यासारखा महान पार्श्वगायक पुन्हा होणार नाही.

**स्मृतिदिनी मुकेश यांना**
**भावपूर्ण आदरांजली!**

# ॥ गणपती माझा नाचत आला...॥



**दिलीप देशपांडे**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा. ८९९९५६६९१७**

गणपती बाप्पा आले घरा घराचे मंदिर झाले बघा...

मोरयाी मोरयाी गणपति बाप्पा मोरया, गणपती माझा नाचत आला, आला रे आला गणपती आलाी.. असा जयजयकार करून आपण आज गणपतीची स्थापना करत आहोत.

गणेश उत्सव हा भारतीय संस्कृतीतील एक महत्त्वाचा आणि लोकप्रिय असा सण आहे. दरवर्षी भाद्रपद महिन्यात शुक्ल चतुर्थीला गणेश उत्सवाची सुरुवात होते. या दिवशी श्री गणेशाची प्रतिष्ठापना करून दहा दिवसांच्या उत्सवाला प्रारंभ होतो. हा उत्सव केवळ धार्मिक उत्सव नसून सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यावरणीय, आर्थिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे.


गणेशोत्सव हा सर्वप्रथम धार्मिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा आहे. भगवान श्री गणेश हे बुद्धी, ज्ञान, समृद्धी आणि संकट अडथळे दूर करणारे देव मानले जातात. विघ्नहर्ता म्हणतात प्रत्येक शुभ कार्याच्या प्रारंभी गणपतीची पूजा केली जाते.

गणेश चतुर्थीच्या दिवशी गणेशाची मूर्ती घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी स्थापित करून विधिपूर्वक पूजा केली जाते. दहा दिवसांच्या उत्सवामध्ये रोज आरती, भक्तिगीते, स्तोत्रपठण आणि प्रसाद यांचा समावेश असतो. अनेक घरांमध्ये मंडळामध्ये पेढ्याचा मोदक तसेच उकडीचे मोदक आणि ओल्या नारळाचे मोदक करून गणपतीला २१ १०१ १००१ मोदकांचा नैवेद्य दाखवला जातो. अनेक मंडळांमध्ये गणपती अथर्वशीर्षचे सामूहिक पठण होत असते पुण्यामध्ये तर दगडूशेठ हलवाई गणपतीसमोर हजारो स्त्रिया ऋषिपंचमीच्या दिवशी सामूहिक अथर्वशीर्ष पठण करत असतात. श्री गणेशाच्या या पूजेमुळे लोकांमध्ये श्रद्धा, भक्ति आणि समर्पणाची भावना जागृत होते. गजानना श्री गणराया आधी वंदू तुज मोरया... दाता तू गणपती गजानना... गणराज रंगी नाचतो नाचतो... चिकमोत्याची माळ, होती ग तीस तोळ्याची ग... अशी गणपतीची सुंदर सुंदर गाणे या काळात आपल्या कानावर पडतात.

गणेश उत्सवाच्या निमित्ताने समाजात एकात्मता आणि बंधुभाव वाढतो. या उत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी लोक एकत्र येतात, एकमेकांना सहकार्य करतात आणि सामाजिक बंधनं मजबूत करतात. सार्वजनिक गणेशोत्सवांमध्ये मंडळं, समाजाचे विविध घटक एकत्र येऊन गणेश मूर्तीची स्थापना करतात. एकत्रितपणे होणाऱ्या या उत्सवामुळे समाजात एकात्मता आणि आपुलकीची भावना वाढीस लागते. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, सर्वजण या उत्सवात एकत्र सहभागी होतात आणि समानतेचा संदेश देतात.

धर्मिक महत्त्वासोबतच सांस्कृतिक महत्त्वही तेवढेच आहे.

गणेश उत्सव हा सांस्कृतिक महोत्सव म्हणूनही महत्त्वाचा आहे. या उत्सवाच्या दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, नृत्य, गायन, नाटकं आणि स्पर्धा आयोजित केल्या जातात. निरनिराळे देखावे करून आरास केली जाते. या कार्यक्रमांमधून भारतीय संस्कृतीचे विविध पैलू, कला आणि परंपरांचा प्रचार आणि प्रसार होतो. अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालयं आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन केलं जातं. यामुळे नवोदित कलाकारांना आपली कला सादर करण्याची संधी मिळते आणि संस्कृतीचे संवर्धन होते.



हे सर्व साजरे करत असताना पर्यावरणाचा समतोल राखून प्रदूषण निर्माण होणार नाही याबाबतीतही लक्ष देणे तेवढेच आवश्यक आहे

गणेश उत्सवाच्या काळात पर्यावरणाशी संबंधित समस्या देखील वाढत आहेत. आरोग्याला घातक रंगाचा वापर, घातक प्लास्टिक प्लास्टिकची फुले,निर्माल्य, परंतु सध्या पर्यावरण संरक्षणाची जागरूकता वाढली आहे आणि यासाठी अनेक उपाययोजना केल्या जात आहेत. गणेश मूर्तीमध्ये प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी मातीच्या मूर्तींचा वापर, नद्यांमधील प्रदूषण टाळण्यासाठी कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर, नैसर्गिक रंगांचं महत्त्व आणि गणेशोत्सवाच्या काळात प्लास्टिकमुक्त वातावरणाची गरज यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा केली जाते. त्यामुळे गणेश उत्सव पर्यावरणपूरक साजरा करण्याचं महत्त्व लोकांमध्ये रुजत आहे. तरीही अजून सुधारण्याला भरपूर वाव आहे असे म्हणावे लागेल. गणेश उत्सवाच्या काळात लोककला आणि हस्तकलांच्या प्रचाराचा एक महत्त्वाचा कालखंड असतो. गणेशाच्या मूर्ती तयार करणारे कलाकार, पारंपारिक शिल्पकला, चित्रकला आणि विविध हस्तकलांचा विकास होतो. गणेश मूर्तीमध्ये विविध पारंपारिक पद्धतींनी केलेली कारागिरी पाहायला मिळते. यामुळे लोककला आणि हस्तकला यांचा विकास होऊन त्या कलेत गुंतलेल्या कारागिरांना रोजगाराची संधी मिळते. आणि लोककला आणि हस्तकला यांचेही संवर्धन होत असल्याचे आपणास दिसते.

गणेश उत्सवाच्या काळात महिला देखील विविध कार्यक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी होतात. महिला मंडळं उत्सवाचं आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी स्पर्धा, पाककला स्पर्धा इत्यादीतून आपले कौशल्य दाखवतात. यामुळे महिलांना समाजात सन्मान मिळतो आणि त्यांचं सक्षमीकरण होतं. सार्वजनिक गणेशोत्सवांमध्येही महिलांना महत्त्वाची भूमिका दिली जाते, ज्यामुळे महिलांच्या सहभागाचं महत्त्व अधोरेखित होतं. आता गणपतीच्या मिरवणुकीमध्ये मुलींच्या ढोल ताशा पथकाचा समावेश असतो ही खूप उल्लेखनीय बाब आहे त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास ही वाढतो. खंबीरपणा येतो.

गणेश उत्सवाचा आर्थिक परिणामही महत्त्वाचा आहे. या उत्सवाच्या काळात बाजारपेठेत विविध वस्तूंची मागणी वाढते. गणेश मूर्ती, सजावट साहित्य, पूजा साहित्य, वस्त्र, फळं, मिठाई, आणि इतर वस्तूंच्या विक्रीत वाढ होते. यामुळे अनेकांना रोजगाराची संधी मिळते. विशेषतः हस्तकला, मूर्तीकला आणि वस्त्रउद्योग यांना चालना मिळते. यामुळे स्थानिक व्यवसायिकांना फायदा होतो आणि अर्थव्यवस्थेत योगदान मिळतं.

गणेश उत्सवात शैक्षणिक महत्त्वही आहे. गणेश उत्सवाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा आणि इतिहासाबद्दल माहिती मिळते. शाळांमध्ये गणेशोत्सव साजरा केल्याने विद्यार्थ्यांमध्ये एकात्मतेची भावना वाढते. विविध स्पर्धांमधून विद्यार्थी आपले कौशल्य दाखवतात. त्याचप्रमाणे गणेशाच्या उपदेशांवर आधारित शैक्षणिक संदेश दिले जातात, व्याख्यानमाला आयोजित केल्या जातात ज्यामुळे विद्यार्थ्यांना चांगले विचार, संस्कार मिळतात.

गणेश उत्सवाच्या काळात आधुनिकतेचा आणि पारंपारिकतेचा संगम पाहायला मिळतो. काही ठिकाणी आधुनिक संगीत, डीजे, लेझर लाईट शो यांचा समावेश असतो, तर काही ठिकाणी पारंपारिक नृत्य, गायन आणि वाद्य संगीताचे कार्यक्रम असतात. यामुळे पारंपारिकतेला सन्मान दिला जातो, तसेच आधुनिकता स्वीकारून उत्सव अधिक आकर्षक बनतो. परंतु सध्या डीजे लेझर लाइटिंग शो ह्याचा अतिरेक झाल्यामुळे अनेक वाईट गोष्टी घडतात त्याच्या प्रकाश, आवाजामुळे कर्णबधिरता येणे, हार्ट अटॅक येणे, लहान मुलांना, रुग्णांना त्रास होणे, अंधत्व येणे अशा अनेक गोष्टी घडतात की त्यामुळे आता बरेच गणेश मंडळांनी त्याचा वापर बंद केला आहे. परंतु अशी फार कमी मंडळ आहेत. त्यामुळे त्याच्यावर बंदी सुद्धा आणली गेली होती. आता तर गणेशोत्सव राज्याचा महोत्सव म्हणून साजरा केला जाणार आहे, त्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे. सर्वांनीच हा गणेशोत्सव यशस्वी करायचा आहे आणि ती जबाबदारी ही शासनासोबत गणेश मंडळाची आणि सर्व जनतेही आहे हे लक्षात ठेवायला हवे. गणेशोत्सवाच्या काळात गावोगावी एक चांगले वातावरण निर्माण झाले असते. अगदी लहान लहान खेडेगावापासून तर अगदी मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, सर्व ठिकाणी हा उत्सव अतिशय आनंदात आणि उत्साहात साजरा होत असतो. पुण्यातील दगडूशेठ हलवाई गणपती, राजूरचा गणपती, तसेच जळगाव जिल्ह्यातील पद्मालय येथील गणपती, ठाणे जिल्ह्यातील टिटवाळा येथील गणपती, यवतमाळ जिल्ह्यातील कळंबचा गणपती, नागपूरचा टेकडी गणपती, सांगलीचा पटवर्धन बागेतील गणपती, मुंबईचा सिद्धीविनायक गणपती, लालबागचा गणपती, पुण्यातील कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी गणपती, गुरुजी तालीम गणपती, तुळशीबाग गणपती, मंडई गणपती, जिलब्या मारुती मंडळाचा गणपती, केसरी वाडा गणपती, भाऊसाहेब रंगारी गणपती.सारसबाग गणपती, अशी अनेक प्रसिद्ध गणपती मंदिरे महाराष्ट्रात आहेत.

गणेश उत्सव हा केवळ धार्मिक सण नसून त्याचा सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरण, आर्थिक आणि शैक्षणिक महत्त्व आहे. या उत्सवामुळे समाजात एकात्मता, समर्पण आणि सद्भावना वाढीस लागते. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून आपण पर्यावरणाचं संरक्षण करू शकतो. तसेच, सांस्कृतिक आणि पारंपारिकतेचं जतन करणे आणि आधुनिकतेचा स्वीकार करून उत्सव अधिक समृद्ध करणे हे आपल्या हातात आहे. गणेश उत्सव साजरा करताना त्याच्या विविध पैलूंना सन्मान देऊन आपण एक समृद्ध आणि सशक्त समाज निर्माण करू शकतो. एका मोठ्या विचाराने लोकमान्य टिळकांनी, भाऊसाहेब रंगारी यांनी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले ते आपण टिकवायला हवे.अनेक वाईट अप्रिय घटना समाजात घडताहेत त्या कुठेतरी बंद व्हायला हव्यात.

गजाननाचे आगमन होत आहे तेव्हा आपण आपल्या देशात शांतता नांदावी, एकमेकात बंधुभाव निर्माण व्हावा, देशभक्ती वाढीस लागावी, आपली संस्कृतीचा जोपासना व्हावी. या देशात पोशिंदा म्हणतो त्या बळीराजाला चांगले दिवस यावे,तरुणांच्या हाताला काम मिळावे म्हणून प्रार्थना करूया.

**तेव्हा आमची प्रार्थना ऐकून घे रे बा गजानना !!!**

## बाप्पा तुझं येणं

पाहताच तुला बाप्पा
विसरून गेले भान,
डोळ्यातून आनंदाश्रू वाहत
शब्दांचे हरवले भान...

डोळ्यात तुझ्या आपुलकीचे
दिसतात मला भाव,
विसरून जाते देवा,
माझा मलाच लागत नाही ठाव...

रूप तुझे सुंदर
वर्णन करू तरी मी काय,
शब्दांच्या पलीकडचे सौंदर्य
तू वात्सल्याची माय...

तुझ्या येण्याच्या चाहुलीने
वेदनांचे हरवते पान,
तुझ्या दर्शनाने होते
माझे मन बेभान...

खूप काही सांगायची असते
बाप्पा माझ्या मनाची व्यथा,
तुला पाहताच विसरते
माझ्या सर्व दुखमय कथा...

बाप्पा तुझं येणं
म्हणजे माझं तुझ्यात गुंतनं
सर्व काही बाजूला सारून
माझं मला विसरणं...

**- ज्योती रावराणे,**
**कांजुरमार्ग, मुंबई**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## श्रीमूर्ती विसर्जनासाठी नमुंमपा तर्फे १४३ कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२६, नवी मुंबई :** संपूर्ण जगभरात उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवास 'राज्य महोत्सव' घोषित करीत मुख्यमंत्री महोदयांनी नागरिकांच्या मनातील गणेशोत्सवाची महती अधोरेखित केली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीनेही श्रीगणेशोत्सवानिमित्त विविध उपक्रम, कार्यक्रम तसेच सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धांचे नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात येत आहे. वातावरणाचे बदलते स्वरूप लक्षात घेऊन गणेशोत्सवासारखा सर्वस्पर्शी उत्सवही पर्यावरणाची जपणूक करीत साजरा व्हावा या भूमिकेतून आयुक्तांनी 'पर्यावरणपूरक प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव' साजरा करावा असे आवाहन नागरिकांना मागील महिन्यापासून सातत्याने नागरिकांना केले आहे व त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

नागरिकांनी पर्यावरणाची जपणूक करण्याच्या दृष्टीने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींची प्रतिष्ठापना न करता पर्यावरणपूरक शाडूच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करावी तसेच श्रीमूर्तींचे विसर्जन नैसर्गिक जलस्त्रोतात न करता महानगरपालिकेने ठिकठिकाणी मोठ्या संख्येने निर्माण केलेल्या १४३ कृत्रिम विसर्जन तलावांपैकी आपल्या घराजवळील कृत्रिम विसर्जन तलावात करावे असे आवाहन करण्यात आलेले आहे. महत्वाचे म्हणजे मा.न्यायालयाच्या आदेशानुसार व महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ६ फूटापेक्षा कमी उंचीच्या श्रीमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करावयाचे आहे.

याशिवाय श्रीगणेशोत्सवाच्या सजावटीत प्लास्टिक व थर्माकोलचा वापर पूर्णपणे टाळून कापड, कागद अशा पुनर्वापरयोग्य साहित्याचा वापर करावा तसेच कर्णकर्कश्य ध्वनी टाळून मर्यादित आवाजात वाद्यांचा वापर करावा आणि लेझर लाईटचा वापर टाळावा असेही आवाहन करण्यात आलेले आहे.

श्रीगणेशोत्सवामध्ये मंडप उभारणीकरिता कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारण्यात आलेले नसून मंडप परवानगीसाठी एक खिडकी स्वरूपात संगणकीय ऑनलाईन ई सेवा उपलब्ध करून दिल्याने मंडळांनी समाधान व्यक्त केले आहे.

इकोफ्रेन्डली प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे मंडळांना आवाहन करताना श्रीगणेशमूर्तीच्या विसर्जनासाठी नागरिकांना त्यांच्या घरापासून जवळ विसर्जनस्थळे उपलब्ध व्हावीत याची खबरदारी घेत मागील वर्षीपेक्षा वाढ करीत १४३ इतक्या मोठया प्रमाणावर कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात आली आहे.

या कृत्रिम तलावांच्या जागा परिमंडळ व अभियांत्रिकी विभागामार्फत निश्चित करण्यात आल्या असून त्याठिकाणी कृत्रिम तलाव उभारणीचे काम आता



अंतिम टप्प्यात आहे. यामध्ये बेलापूर विभागात २०, नेरुळ विभागात २६, वाशी विभागात १६, तुर्भे विभागात २१, कोपरखैरणे विभागात १६, घणसोली विभागात १६, ऐरोली विभागात १८ व दिघा विभागात १० अशाप्रकारे एकूण १४३ कृत्रिम विसर्जन तलाव उभारले जात आहेत.

नागरिकांनी न्यायालयाच्या निर्णयानुसार व शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ६ फूटांपेक्षा कमी उंचीच्या श्रीमूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन करावयाचे असून पर्यावरणपूरक दृष्टीकोन जपत मोठ्या मूर्तींसाठीही प्राधान्याने कृत्रिम विसर्जन तलावांचाच वापर करावा असे आवाहन विविध माध्यमांतून करण्यात आले आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २२ पारंपारिक विर्सजन स्थळे असून त्याठिकाणी होणारी भाविकांची गर्दी विभागली जावी व एकाच ठिकाणी गर्दी होऊ नये याकरीता मागील काही वर्षांपासून कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती करण्यात येत आहे.

नैसर्गिक आणि कृत्रिम विसर्जन स्थळांवर संबंधित विभाग कार्यालयांमार्फत विसर्जन व्यवस्था सुसज्ज असणार असून स्वयंसेवक, जीवरक्षक, अग्निशामक यांचेसह विद्युत, सीसीटिव्ही, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, निर्माल्य वाहतुक अशा सर्व सुविधा तसेच तराफे, फोर्कलिफ्ट अशी यंत्रसामुग्री सुसज्ज असणार आहे. नवी मुंबई महानगरपालिका आणि पोलीस विभागाने गणरायाचा उत्सव निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी सुयोग्य नियोजन केलेले आहे.

तरी पर्यावरणप्रेमी नवी मुंबईकर नागरिकांनी श्रीमूर्ती शाडूची व पर्यावरणपूरक असेल याची काळजी घ्यावी त्याचप्रमाणे श्रीमूर्तींचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे अथवा नजिकच्या कृत्रिम विसर्जनस्थळी करावे आणि पर्यावरणशील इकोफ्रेन्डली प्लास्टिकमुक्त गणेशोत्सव साजरा करावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मिंदे गटामुळे महाराष्ट्राला गद्दारीचा शाप लागलाय : मनसेचे नेते राजू पाटील



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२६, कल्याण (ठाणे) :** सध्या महाराष्ट्रभर पक्ष फोडायचे राजकारण चालले आहे. दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी शिंदे गटामध्ये कल्याण मधील मनसे आणि राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रवेश केला. त्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते आणि माजी आमदार राजू पाटील यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल केली आहे. ही पोस्ट महाराष्ट्रभर व्हायरल होत आहे आणि या पोस्टची चर्चा होत आहे. या पोस्टमध्ये राजू पाटील म्हटले आहे. गद्दारांची टोळी सगळ्या गद्दारांनाच गोळा करत फिरत आहे. ५० खोके घेऊन हे फुटले आता इतरांना खोके वाटत फिरतायत. यांना काय कळणार इमान आणि निष्ठा म्हणजे काय? यांनी तर फक्त स्वार्थासाठी आपल्याच नेत्याच्या पाठीत खंजीर खुपसायचा प्रयत्न केलाय. या मिंधे गटामुळे महाराष्ट्राला गद्दारीचा शाप लागलाय. ज्यावेळी स्वत: ला पोरगं होत नाही तेव्हा दुसऱ्याचं मुल मांडीवर घ्यावे लागते. मिंधे गटाची हीच अवस्था आहे. आणि ज्यांना खांद्यावर घेतले तीच लोक डोक्यावर पाय देऊन गद्दारांच्या टोळीत सामील झालेत. पण या गद्दारांना गाडल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही. असे आमदार राजू पाटील यांनी म्हटले आहे.

# निवडणुकीसाठी इच्छुक गाव पुढाऱ्यांची मोर्चेबांधणी सुरू

## जिल्हा परिषद, पंचायत समिती आरक्षणाच्या भितीने अनेकांच्या पोटात गोळा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** साडेतीन वर्षापासून रखडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांनी नुकताच अंतिम आराखडा प्रसिद्ध केल्याने या निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांचे लक्ष आता आरक्षणाकडे लागले आहे. महिनाभरात ही प्रक्रियाही पूर्ण होण्याची शक्यता असल्याने इच्छुक गाव पुढाऱ्यांनी गट आणि गणासाठी आताच निवडणुकीची मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. तर काहीं जणांनी प्रचाराची पहिली फेरीही पूर्ण केली असून, शेतकरी – शेतमजूरांना ते कोरडी आश्वासने देत सुटल्याचे दिसून येते आहे. ओबीसी आरक्षणाच्या सुधारित नियमाबाबत ग्राम विकास विभागाच्यावतीने मागील आठवड्यात राजपत्र प्रसिध्द करण्यात आले आहे. यात यंदापासून झेडपी व पंचायत समितीसाठी नव्याने आरक्षण काढण्यात येणार आहे. मागील आरक्षणाचा प्रभाव नव्याने काढण्यात येणार्या आरक्षणावर राहणार नसल्याने अनेक गट आणि गणात मोठे फरबदलाची शक्यता आहेत.

नव्याने निघणार्या आरक्षणाच्या भितीमुळे अनेक



ठिकाणी इच्छुक धास्तावले असून आपल्या गटात कोणते आरक्षण निघणार याचा अंदाज बांधण्यात सध्या व्यस्त असल्याचे दिसत आहेत. मनाप्रमाणे आरक्षण निघणार की नाही, आरक्षण न निघाल्यास गेल्या काही वर्षातील तयारीचे काय होणार या भितीपोटी अनेकांच्या पोटात गोळा आल्याचे चित्र आहे. २०१७ जिल्हा परिषदेच्या आणि पंचायत समितीच्या निवडणूक झाल्यानंतर २०२२ ला त्यांची मुदत संपणार होती. मात्र, त्यानंतर सुमारे साडेतीन वर्षे निवडणूका रखडल्या. यामुळे गावागावात राजकारण करणार्या पुढार्यांवर राजकीय बेरोजगारीची कुर्हाड कोसळी. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर नगरसह राज्यात गट आणि गणाची प्रभाग रचना जाहीर झाली असून आता सर्वांच्या नजरा आता आरक्षणाकडे लागल्या आहेत.

गेल्या पंचवार्षिकला अहिल्यानगर जिल्ह्यात ७३ जिल्हा परिषद गट होते. यात अनुसूचित जातीसाठी ९ (महिला ५), अनुसूचित जमातीसाठी ७ (महिला ४), नागरिकांचा मागासप्रवर्गासाठी २० (महिला १०) असे आरक्षण निघाले होते. सर्वसाधारण प्रवर्गासाठी १८ आणि सर्वसाधारण प्रवर्गातील महिला १८ असे ७३ गटांचे आरक्षण होते. यंदा जिल्हा परिषद गटांची संख्या ही ७५ झाली असून यामुळे वाढवणारे आरक्षण कोणत्या प्रवर्गात जाणार हे प्रारूप आरक्षण जाहीर झाल्यानंतर कळणार आहे. यंदाच्या आरक्षणाच्या नवीन राजपत्रात ५० च्या खाली गुणांकन असणारा शुन्य आणि ५१ पेक्षा अधिक गुणांकन असणारा संपूर्ण एक असणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. या अर्ध्या गुणांकानाचा कोणत्या प्रवर्गावर प्रभाव पडणार हे लवकरच कळणार आहे. यामुळे गाव पुढाऱ्यांचा जीव आणखीच टांगणीला लागला आहे.

## गणपती उत्सवानिमित्त विंचूर शहरातून पोलिसांचा मार्ग संचलन




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२६, विंचूर (नाशिक) :** आज विंचूर येथे गणपती उत्सव शांततेत आणि सुव्यवस्थेत पार पडावा, तसेच शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी पोलीस प्रशासनाकडून मंगळवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी दणदणीत (रूट मार्च) मार्ग संचलन काढण्यात आले. हा रूट मार्च विंचूर पोलीस स्टेशनपासून सुरू झाला. त्यानंतर कॉलेज रोड, मारवाडी पेठ, नेहरू चौक, बजरंग मंडळ, सिद्धार्थ नगर, बाजार गल्ली आदी प्रमुख मार्गावरुन मार्गक्रमण करत पुन्हा पोलीस स्टेशन येथे समारोप झाला. यावेळी रॅपिड ॲक्शन फोर्ससह दंगा नियंत्रण पथकाची प्रभावी तुकडी, पोलिसांचा ताफा व पोलीस वाहनांनी शहरात शिस्तबद्ध संचलन केले. रूट मार्च दरम्यान नागरिकांनी पोलीस ताफ्याचे स्वागत करत उत्सव शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. रूट मार्चमुळे शहरात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहणार असल्याचा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला. हा रूट मार्च लासलगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. त्यावेळी उपनिरीक्षक किरण साळुंके, उपनिरीक्षक मोहन पाटील, हवालदार सागर आरोटे, अविनाश सांगळे यांच्यासह मोठ्या संख्येने पोलीस कर्मचारी उपस्थित होते. पोलीस प्रशासनाकडून गणेशोत्सव काळात सतर्कता व काटेकोर सुरक्षा व्यवस्था ठेवली जाणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

# सुपा, ढोकी टोल नाक्यांवरील वसुली थांबवा

## खराब रस्त्यांमुळे अपघात, राजेंद्र उबाळे यांचा प्रशासनाला इशारा




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, पारनेर (अहिल्यानगर) :** खराब रस्त्यांवर टोल आकारणी नको या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेत पारनेर तालुक्यातील नगर-पुणे महामार्गावरील सुपा टोल नाका आणि नगर-कल्याण महामार्गावरील टाकळी ढोकेश्वर येथील ढोकी टोल नाक्यावर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

रिपब्लिकन पाट ऑफ इंडियाचे पारनेर तालुका अध्यक्ष राजेंद्र उबाळे यांनी ही मागणी तीव्रतेने मांडली आहे. खराब रस्त्यांमुळे होणारे अपघात आणि नागरिकांचा मृत्यू हा चिंतेचा विषय असल्याचे त्यांनी सांगितले.

उबाळे यांच्या मते, या महामार्गांवरील रस्त्यांची दुरवस्था गंभीर आहे. खड्ड्यांमुळे वाहनचालकांचे जीव धोक्यात येत असून, नगर कल्याण महामार्गाचे काम सुरू असल्याने अनेकांचा मृत्यू झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार, रस्त्यांची देखभाल योग्य नसेल तर टोल आकारणी बेकायदेशीर आहे. त्यामुळे या टोल नाक्यांवर तातडीने कारवाई करून टोल वसुली थांबवावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी ठोस पावले उचलण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांनीही या मागणीला पाठिंबा दर्शवला असून, प्रशासनाने त्वरित लक्ष घालावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तालुकाध्यक्ष उबाळे यांनी प्रशासनाला इशारा देताना म्हटले की, जर रस्त्यांची दुरुस्ती आणि टोलमुक्तीची मागणी पूर्ण झाली नाही, तर तीव्र आंदोलन छेडले जाईल. याबाबत प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## चंद्रपूरमध्ये लवकरच १८ हजार नागरिकांना घरपट्टे वाटप

### महसूलमंत्री बावनकुळे यांचे निर्देश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील महसूल विषयक बाबी वेगवान पद्धतीने निकाल निघाव्या आणि लोकांना तातडीने न्याय मिळावा यासाठी शहरासह जिल्ह्यात पदभरती करण्यासोबतच, चंद्रपूर शहरातील १८ हजार नागरिकांना नझूल आणि इतर विभागांच्या जागेवरील घरांचे पट्टे वाटप करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय घेण्यात आला आहे. स्थानिक आमदारांनी कामाची गती कमी असल्याबद्दल व्यक्त केलेल्या नाराजीनंतर, महसूलमंत्र्यांनी या कामासाठी बाह्य एजन्सी नेमून तातडीने काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीवेळी हे निर्देश देण्यात आले. बैठकीला आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा, आणिमचंद्रकपूरचे काही नागरिक व महसूलचे अधिकारी उपस्थित होते.

**नवीन कार्यालये आणि पदभरती –**

महसूल विभागातील रिक्त जागांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी संजय गांधी योजना शाखेतील तहसीलदार (मनपा क्षेत्र) ही पदे पुनरुनिज्जीवित करण्याचे आदेश देण्यात आले. यासोबतच, घुग्घुस (चंद्रपूर) येथे अप्पर तहसीलदार कार्यालय स्थापन करण्यासोबतच सहा नवीन तहसीलदार कार्यालयांमध्ये पदे भरण्यात येणार आहे. चंद्रपूर शहर महानगरपालिका नझूल क्षेत्रासाठी ३ नवीन तलाठी साझे आणि एक अतिरिक्त तलाठी पद जागा आणि क्रीडा संकुलाचा मुद्दा मार्गी लागला आहे.

# गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद सणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस विभागाची समन्वय बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२६, बल्लारपूर (चंद्रपूर) :** येत्या गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद सणाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी राजुरा पोलीस उपविभागाची समन्वय बैठक बल्लारपूर येथील एकदंत लॉन येथे पार पडली. बैठकीत मार्गदर्शन करताना अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांनी सांगितले की, उत्सव काळात वैद्यकीय पथक उपलब्ध राहणार आहे. डीजे बाबत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक असून उल्लंघन झाल्यास कठोर कारवाई केली जाईल. गणेशोत्सवासाठी शासनाच्या परिपत्रकानुसार परवानगी घेणे आवश्यक आहे. प्रत्येक मंडळाचा व्हॉट्सॲप ग्रुप तयार करण्यात येईल. त्यामध्ये मंडळाचे अध्यक्ष, सचिव तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असेल.

यावेळी मंचावर उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव, राजुराचे तहसीलदार ओमप्रकाश दौंड, बल्लारपूरचे नायब तहसीलदार सतिश साळवे, बल्लारपूरचे मुख्याधिकारी विशाल वाघ, राजुरा नगर परिषदेचे मुख्याधिकारी हेमाजी धुमाळ, बल्लारपूरचे ठाणेदार बिपिन इंगळे व राजुराचे ठाणेदार सुमित परतेकी उपस्थित होते. उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव यांनी गणेशोत्सव व ईद-ए-मिलाद हे सण परवानगी घेऊन, शांततेत आणि भाईचाऱ्याने साजरे करण्याचे आवाहन केले.

कातकडे यांनी पुढे सांगितले की, आदर्श गणपती मंडळ पुरस्कार देण्यात येणार असून त्यासाठी पारंपारिक वाद्यांचा वापर, समाजप्रबोधनात्मक देखावे, विसर्जन मिरवणुकीत महिलांचा व ज्येष्ठांचा सहभाग, वृक्षारोपण, चित्रकला व संगीत स्पर्धा, रक्तदान, व्यसनमुक्ती तसेच प्लास्टिक मुक्त उपक्रम या बाबींना प्राधान्य दिले जाईल. सोशल मीडियाचा योग्य वापर करून उत्सव साजरा करण्याचे आवाहनही त्यांनी केले. नगर




परिषदेचे मुख्याधिकारी विशाल वाघ यांनी शहरातील गोल पुलिया संदर्भात रेल्वे प्रशासनाशी तातडीने बैठक घेऊन जीएसबी टाकण्याचे नियोजन करण्यात आल्याचे सांगितले. तसेच गणपती घाटावर लायटिंगची व्यवस्था आणि रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याची कामे तातडीने हाती घेतली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत पत्रकार वसंत खेडेकर, मनोहर दोतपल्ली, रमेश निषाद, समीर केणे, राहुल गायकवाड, ग्यानेंद्र आर्य, यांच्या सह बल्लारपूर शहरातील पत्रकार बांधव, सादीक जव्हेरी, अफजल अली, नरेश मुंदडा तसेच चंद्रपूर जिल्हा शांतता समितीचे काशिनाथ सिंह, नासीर उर्फ भुरू, अमर रहिकवार आदींनी सुचना मांडल्या. याशिवाय गणेश मंडळाचे कार्यकर्ते, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, डीजे मालक, कोठारी पोलीस ठाण्याचे ठाणेदार योगेश खरसान, एम.एस.ई.डी.सी.एल. चे उपकार्यकारी अभियंता अरविंद कातकर यांच्यासह विविध विभाग प्रमुख तसेच राजुरा पोलीस उपविभागातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कल्याण परिमंडळ-३ हद्दीत गणेशोत्सवासाठी पोलीस प्रशासन सज्ज

### गणपती व गौरी स्थापनेचे वेळापत्रक जाहीर

**अक्षयज : विश्वनाथ शेनॉय**

**दि.२६, कल्याण (ठाणे) :** कल्याण परिमंडळ-३ हद्दीत यंदाचा सार्वजनिक व खाजगी गणेशोत्सव उत्साहात आणि दणदणीत साजरा करण्यासाठी पोलीस प्रशासनाने कंबर कसली आहे. दिनांक २७ ऑगस्ट २०२५ पासून ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत गणेशोत्सव साजरा होणार असून, यासाठी गणपती व गौरी स्थापनेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सार्वजनिक व खाजगी गणपती स्थापना २७ ऑगस्ट २०२५ रोजी होणार असून, ३१ ऑगस्ट २०२५ रोजी गौरी स्थापना करण्यात येणार आहे. सण काळात शांतता, सुव्यवस्था आणि सुरक्षिततेसाठी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. यामध्ये वाहतूक व्यवस्थेसाठी स्वतंत्र पथके नेमण्यात येतील. मंडळांनी नियमांचे पालन करून गणेशोत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे. गणेशोत्सव हा श्रद्धा, भक्ती, उत्साह आणि सांस्कृतिक परंपरेशी जोडलेला असल्याने सर्वांनी कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून सण आनंदात आणि सुरक्षिततेचे साजरा करावा, असे आवाहन पोलीस उपायुक्तांनी केले आहे

# अक्षराज मीडियाच्या बातमीचा इम्पॅक्ट ; मनसेच्या वृक्षारोपण आंदोलनाची दखल

## शिळ-दिवा रस्त्यावर खड्डे बुजवायला सुरुवात...

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि. २६, दिवा (ठाणे) :** अखेर मनसेच्या आंदोलनाची अक्षराज मीडियाची बातमीची दखल प्रशासनाने घेतली,खड्डे बुजवायला सुरुवात केली आहे. शिळ -दिवा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याची बातमी अक्षराज मीडियावर २० ऑगस्ट २०२५ रोजी दाखवण्यात आली होती.

२२ ऑगस्ट २०२५ रोजी मनसेने रस्त्यात पडलेल्या खड्ड्यात वृक्षारोपण केल्याची ही बातमी अक्षराज मीडियावर दाखवण्यात






आली.शिळ दिवा रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. त्यामुळे वाहन चालकांना, नागरिकांना चिखलाच्या खड्ड्यातूनच मार्ग काढावा लागत होता. खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडी होत होती.

त्यामुळे तासून तास वाहतूक कोंडी मध्ये नागरिकांचा वेळ वाया जात होता. ॲम्बुलन्स, अग्निशामकच्या गाड्या ट्राफिक रखड्याच्या, रिक्षा चालकांचा व्यवसायही त्यामुळे बसला होता. मेंटेनेस चा खर्चही वाढला होता. ही बातमी अक्षराज मीडियावर दाखवण्यात आल्यानंतर प्रशासनाला आता जाग आली आहे. आज खड्डे बुजवायला सुरुवात केली आहे. उद्यापासून गणेश उत्सवाला सुरुवात होत आहे.

भारतभर हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. नातेवाईक मंडळी दर्शन घेण्यासाठी येत असतात खड्ड्यात कोणाचा अपघात होऊ नये आणि वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी ही बातमी अक्षराज मीडियावर दाखवण्यात आली होती. खड्डे बुजवायला सुरुवात झाल्यामुळे नागरिकांना आता दिलासा मिळाला आहे.अक्षराज मीडियाचे आणि मनसेचे, ठाणे आयुक्तांचे नागरिकांनी आभार मानले आहेत.

# ठाणे शहर पोलीसांकडून सायबर योद्ध्यांची नियुक्ती

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२५, ठाणे :** सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी ठाणे शहर पोलीसांकडून एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. शहरातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये कार्यरत सायबर सेलमध्ये तांत्रिक तपासासाठी मदत करण्यासाठी सायबर योद्धे नियुक्त करण्यात आले आहेत. आशुतोष डुंबरे, पोलीस आयुक्त, ठाणे यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर व डिकोडटेक इंडस्ट्रीयल ट्रेनिंग प्रा.लि. यांच्या संयुक्त विद्यमाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत ही नियुक्ती करण्यात आली आहे.




## सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी नवे पाऊल

एकूण १५० सायबर योद्ध्यांची नियुक्ती होणार असून पहिली बॅच म्हणून ७२ योद्ध्यांनी आजपासून कामकाजाला सुरुवात केली. हे योद्धे ११ महिन्यांसाठी इंटरर्नशिप तत्वावर पोलीस ठाण्यांमधील सायबर सेलमध्ये कार्यरत राहतील. हे सर्व विद्यार्थी सायबर सिक्युरिटी, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डिजिटल फॉरेन्सिक या विषयांचे प्रशिक्षण घेतलेले असून त्यांच्या तांत्रिक ज्ञानाचा उपयोग गुन्ह्यांच्या तपासासाठी होणार आहे. त्यांच्या मदतीने जटिल तपास जलदगतीने पार पाडणे आणि सायबर गुन्हेगारांना गाठणे अधिक सुलभ होणार आहे.

नियुक्ती कार्यक्रमाला पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) डॉ.पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त (आर्थिक गुन्हे व सायबर) पराग मणेरे, डिकोडटेक इंडस्ट्रीयल ट्रेनिंग प्रा.लि.च्या संचालिका रेश्मा जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक (सायबर पोलीस ठाणे) प्रकाश वारके तसेच पत्रकार बंधू-भगिनी उपस्थित होते.

# थोडक्यात

## पाटण तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा शेतकरी संघटनेची मागणी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**



**दि.२६ , पाटण (सातारा) :** पाटण तालुक्यात पावसाने कहर केल्याने शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. जे पेरले ते कुजून गेल्याने शेतकऱ्यांच्या हाती काहीच आले नाही. शासनाने पाटण तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा. तसेच शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी, अशी मागणी किसान मंच शेतकरी संघटनेच्यावतीने अध्यक्ष प्रशांत पाटील यांनी तहसीलदार, पाटण यांना मंगळवार, दिनांक २६ ऑगस्ट २०२५ रोजी देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, चालूवर्षी पाटण तालुक्यात १३ मे २०२५ रोजी पाऊस सुरू झाला आहे तो आजपर्यंत थांबलाच नाही. सर्व साधारण मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात आम्ही शेतीची मशागत करून जूनच्या शेवटच्या आठवड्यात पेरणी करतो. मात्र पाऊस न थांबल्यामुळे जवळ जवळ ८० टक्के क्षेत्रात पीक पेराच झाला नाही व ज्या क्षेत्रावर पेरणी झाली ते ही अतिपावसामुळे नुकसान झालेले आहे. तालुक्यात सिंचन प्रकल्प असूनही २५ टक्केपेक्षा कमीच क्षेत्र बागायती आहे. खरीप पिकांवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या जवळपास ७५ टक्केच्या आसपास आहे. एकरी सरसकट ४५ हजार एवढे अनुदान मिळावे, पीक कर्ज पूर्णपणे माफ करून तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## डोंबिवलीत गणेश मूर्ती विक्रेत्याचा गंडा; ऍडव्हान्स घेऊन गायब

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२६, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पश्चिम येथील आनंदी कला केंद्र, चिनाल ग्राउंड येथे गणेश मूर्ती विक्रेते प्रफुल परशुराम तांबडे यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तक्रारीनुसार, तांबडे यांनी एका ग्राहकाकडून गणेश मूर्ती बुकिंगसाठी ₹१५०१ ऍडव्हान्स रक्कम घेतली होती. मूर्तीची किंमत ₹३ हजार ५०० रुपये ठरली होती. मात्र, बुकिंगनंतर त्यांनी मूर्तीचे काम पूर्ण न करता ग्राहकांची फसवणूक केली व ऍडव्हान्स रक्कम घेऊन फरार झाले. या प्रकरणी विष्णुनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५८/२०२५ नोंदवण्यात आला असून, आरोपीवर भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४) व ३१८(२) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत असेही उघड झाले आहे की, आरोपीने अशा प्रकारे अनेक ग्राहकांकडून मूर्ती बुकिंग घेतलेले असून त्यांचे कामही अपूर्ण सोडले आहे. आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस पथक तैनात करण्यात आले असून, गणेशोत्सवाच्या तोंडावर विक्रेत्याच्या या गंड्यामुळे भक्तांमध्ये संताप !

# सध्याच्या काळातही इतिहास विषयात करिअरच्या नवनवीन संधी उपलब्ध - प्रा.डॉ.कोल्हेकर

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२६, मुदखेड (नांदेड) :** सामाजिक शास्त्रातील इतिहास विषय हा नाविन्यपूर्ण विषय असून सध्याच्या आधुनिक युगात देखील इतिहास विषयामध्ये करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. इतिहास विषय हा केवळ सामाजिक शास्त्रातील एक विषय किंवा मानवविद्याशाखा नसून अलीकडच्या काळात इतिहासाचे आंतरविद्याशाखीय महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे जीवनाच्या सर्व क्षेत्रात इतिहासाचे महत्त्व असून केवळ परंपरागत मर्यादित नोकरीच्या संधीच इतिहासामुळे प्राप्त होतात, असे नव्हे तर अँडव्हान्स स्टडीज च्या माध्यमांतून विद्यार्थ्यांना करिअर करण्यासाठी अनेक क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत.

विद्यार्थ्यांनी इतिहास विषयाचे संशोधनात्मक सखोल अध्ययन करून प्राविण्य प्राप्त केल्यास त्यांना विविध क्षेत्रातील करिअरच्या संधी उपलब्ध होतील, असे प्रतिपादन प्रा.डॉ.डी.डी.कोल्हेकर यांनी राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे गुणवत्ता हमी कक्ष व इतिहास विभागाच्या वतीने आयोजित इतिहास विषयातील करिअरच्या संधी या विशेष अतिथी व्याख्यानात केले.

दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आणि दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांच्या हस्ते वेरूळ व अजिंठा या लेण्यांवर आधारित तसेच गडकिल्ले एक सांस्कृतिक वारसा या विषयावर आधारित विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या दोन भितीपत्रकांचे प्रकाशन करण्यात आले. तदनंतर इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन संपन्न झाले कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना या कार्यक्रमासंबंधीची भूमिका इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.आर.एस. कोंडेकर विशद केली त्यामध्ये त्यांनी वर्षभर इतिहास विभागाच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची रूपरेषा स्पष्ट केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.टी. शिंदे होते. आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात त्यांनी जुन्या इतिहासाचे पुनर्लेखन आणि नवीन इतिहासाचे संशोधन अलीकडच्या काळात महत्त्वाचे असल्याचे व तसेच इतिहासाचे आंतरविद्याशाखीय महत्त्व स्पष्ट करताना इतर विषयांशी असलेले नातेसंबंध अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी आपल्या स्थानिक पातळीवरच्या इतिहासाचे अध्ययन करून तो सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक वारसा जतन आव्हान केले. केवळ स्पर्धा परीक्षा असणारे तर खाजगी क्षेत्रात देखील इतिहासाचे अध्ययन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी त्या संधीचा लाभ घेत वस्तुनिष्ठ इतिहास समाजासमोर



मांडणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रा.डॉ. राहुल धावारे व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रकाश कोथळे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन बी.ए.तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. गायत्री पांचाळ हिने केले. तर कार्यक्रमासाठी उपस्थित असलेल्या सर्वांचे बी.ए.तृतीय वर्षाचा विद्यार्थिनी नाझिया पठाण हिने आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयीन कर्मचारी डी.सी.इंगोले, डी.के. डहाळे व एम.डी. डांगे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

## पाटण नगरपंचायतीकडून स्मशानभूमीची स्वच्छता

**अक्षराज : सुरेश संकपाळ**



**दि.२५, पाटण (सातारा) :** पाटण शहरातील पूर ओसरल्यानंतर पाटणच्या स्मशानभूमीत चिखलाचा राडारोडा झाला होता. या ठिकाणी अंत्यसंस्कार करण्यास अडचणी येत होत्या. नगरपंचायत प्रशासनाने टँकरच्या सहाय्याने स्मशानभूमीची संपूर्ण स्वच्छता केली. अंत्यसंस्कार करण्यात येत असलेल्या लोखंडी सांगाड्याचीही मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. त्याची पाहणी मुख्याधिकारी संतोष मोरे, उपनगराध्यक्ष सचिन कुंभार, नगरसेवक उमेश टोळे यांनी करून सांगाडे बदलण्याबाबत संबंधितांना सूचना केल्या. गेल्या काही दिवसांपासून पाटणसह परिसरात जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्याने कोयना धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. त्यामुळे कोयना नदीला पूरपरिस्थिती निर्माण होवून शहरात पाणी शिरले होते. नदीकाठावरील स्मशानभूमी देखील पुराच्या पाण्याखाली गेली होती. पूर परिस्थिती ओसरल्यानंतर स्मशान भूमीत मोठ्या प्रमाणात चिखलाचा राडा झाला होता. चाफोली रोड या ठिकाणी जावून तेथे मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्याची वेळ आली होती. सातारा जिल्हा बँकेचे संचालक तथा भाजपचे नेते सत्यजितसिंह पाटणकर यांच्या सूचनेनुसार उपनगराध्यक्ष सचिन कुंभार यांनी मुख्याधिकारी डॉ.संतोष मोरे यांच्यासोबत स्मशान-भूमीची पाहणी केली. त्यानंतरनगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या मदतीने संपूर्ण स्मशानभूमीची स्वच्छता करण्यात आली व लोखंडी सांगाडे तात्काळ बदलण्याच्या सूचना केल्या.

# विदेशी दारु महागली, 'देशी'ला अच्छे दिन

## बारमधील ग्राहकांची संख्या ५० ते ६० टक्क्यांनी घटली; शासनाचा करवाढीचा हेतूच विफल होण्याची चिन्हे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२६, अहिल्यानगर :** राज्याच्या तिजोरीत महसुलाचा ओघ वाढवण्यासाठी सरकारने विदेशी दारूवर लादलेली जबर करवाढ आता उलटी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. करवाढीमुळे विदेशी दारूच्या किमती प्रचंड वाढल्याने अनेक तळीरामांनी आपला मोर्चा स्वस्त आणि आकर्षक बनलेल्या देशी कडे वळवला आहे. परिणामी, राज्यभरातील बार आणि परमिट रूममधील विदेशी दारूची विक्री निम्म्याहून अधिक घटली असून, शासनाचा महसूल वाढवण्याचा हेतूच विफल होण्याची भीती व्यक्तहोत आहे. शासनाला देशी-विदेशी दारूच्या विक्रीतून यापूर्वी वार्षिक ४३ हजार कोटी रुपयांचा महसूल मिळत होता. मात्र, सध्या असलेली राज्याची आर्थिक चिंता विचारात घेऊन राज्य शासनाने दोन महिन्यांपूर्वी देशी, भारतीय बनावटीची विदेशी आणि विदेशी दारूवर १० टक्के व्हॅट, १५ टक्के परवाना शुल्क आणि ९ ते ७० टक्के जादा उत्पादन शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या करवाढीमुळे शासकीय तिजोरीत आणखी किमान १४ हजार कोटी रुपयांची भर पडेल, असा अंदाज वर्तविण्यात आला होता. मात्र, शासनाच्या या निर्णयाचे विपरीत परिणाम आता राज्यभर दिसू लागले आहेत.

शासनाचा तिजोरी भरण्याचा निर्णय सध्या तरी व्यावसायिकांसाठी आणि ग्राहकांसाठी डोकेदुखी ठरला आहे. विदेशी दारूच्या विक्रीतील मोठी घट पाहता, महसुलाचे लक्ष्य गाठणे शासनासाठी मोठे आव्हान ठरणार आहे. याउलट, या निर्णयामुळे नकळतपणे देशी दारूच्या उद्योगाला चालना मिळाली असून, बनावट दारूच्या बेकायदेशीर व्यापाराला ही खतपाणी मिळत असल्याचे चित्र आहे. नवीन करवाढीनंतर भारतीय बनावटीच्या विदेशी दारूच्या किमती बारमध्ये प्रति बाटली ५० ते २०० रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. याचा थेट परिणाम ग्राहकांच्या संख्येवर आणि विक्रीवर झाला आहे. बारमधील ग्राहकांची संख्या ५० ते ६० टक्क्यांनी कमी झाली आहे. दारुची विक्री तब्बल ७० ते ८० टक्क्यांनी घटल्याचा दावा बार चालकांकडून केला जात आहे.

## सुनील तांबे यांचा क्रीडा सन्मान पुरस्काराने गौरव

**अक्षराज : संदीप येवले**




**दि.२६, मुंबई :** क्रीडा व युवकसेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय - मुंबई उपनगर यांच्या वतीने ठाकूर कॉलेज, कांदिवली (पूर्व) येथे राष्ट्रीय क्रीडा दिन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या समारंभात क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या क्रीडा शिक्षकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यामध्ये ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेच्या शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे शैक्षणिक संकुल, पार्कसाईट, विक्रोळी (पश्चिम) येथील संदेश विद्यालय अँड ज्युनि. कॉलेजचे सहाय्यक शिक्षक सुनील वामन तांबे यांना क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मुंबई उपनगरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी रश्मी आंबेडकर यांच्या शुभहस्ते क्रीडा सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या पुरस्काराबद्दल संस्थेच्या अध्यक्ष पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे, संस्थेचे विश्वस्त प्राचार्य राजेंद्र म्हात्रे आणि शाळेच्या प्राचार्य मेघा म्हात्रे यांनी सुनील तांबे यांचे अभिनंदन केले असून त्यांचे विद्यार्थी व पालक वर्गातून देखील कौतुक होत आहे.

# आदित्य इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या ५९ विद्यार्थ्यांची टीसीएस मध्ये निवड

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.२६, खडकवासला (पुणे) :** जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या आदित्य इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट मध्ये टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस चा भव्य प्लेसमेंट ड्राईव्ह पार पडला. या ड्राईव्हमध्ये ७४० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यापैकी १३० जण ऑप्टिट्यूड टेस्टमध्ये पात्र ठरले. अंतिम मुलाखतीनंतर ५९ विद्यार्थ्यांची टीसीएस बीपीएस मध्ये निवड झाली. यावेळी जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष अ‍ॅड. शार्दूल जाधवर, आदित्य इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या संचालिका डॉ. अनिता खटके, टीसीएस बीपीएसचे मानव संसाधन व्यवस्थापक राहुल गिरी उपस्थित होते. राहुल गिरी यांनी प्लेसमेंट प्रक्रियेबाबत माहिती देत कंपनीतील करिअर संधी बद्दल मार्गदर्शन



केले.

प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर म्हणाले, जाधवर ग्रुपचा प्रवास हा केवळ शैक्षणिक उत्कृष्टता, सर्वांगीण विकास आणि उद्योग क्षेत्राशी घट्ट नाते यांवर आधारित नाही, तर समाजात सुजाण आणि जबाबदार नागरिक घडविण्यावर आमचा भर असतो. विद्यार्थ्यांनी पुढे जाऊन आपल्या कुटुंबाचे, समाजाचे आणि राष्ट्राचे नाव उज्ज्वल करावे.

अ‍ॅड. शार्दूल जाधवर म्हणाले, चांगल्या संधी या उज्ज्वल भविष्याकडे नेणाऱ्या पायऱ्या आहेत. पण केवळ संधी पुरेशा नसतात, तर त्याचा योग्य उपयोग करण्यासाठी कठोर परिश्रम आणि तयारी आवश्यक असते. आम्ही नेहमी विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी जोडणाऱ्या संधी निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील असतो. या माध्यमातून विद्यार्थी आपले करिअर घडवतात. डॉ.अनिता खटके म्हणाल्या, शिस्त, सातत्यपूर्ण शिक्षण आणि कौशल्यवृद्धी ही व्यावसायिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी स्वतः मधील कमकुवत बाजू ओळखून त्यावर सातत्याने काम केले, तर कुठल्याही क्षेत्रात यश दूर नाही. उद्दिष्ट स्पष्ट ठेवून मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांना नक्कीच उज्ज्वल भविष्य मिळते.

राहुल गिरी म्हणाले, टीसीएस बीपीएस मध्ये करिअरच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत. भरती प्रक्रियेत प्रामाणिकपणा, मेहनत आणि सकारात्मक दृष्टिकोन या गोष्टी निर्णायक ठरतात. विद्यार्थ्यांनी स्वतःला सतत अपडेट ठेवणे, नवीन कौशल्ये शिकणे आणि आत्मविश्वासाने प्रत्येक टप्प्याला सामोरे जाणे गरजेचे आहे. अशा वृत्तीने काम करणाऱ्यांसाठी कॉर्पोरेट जगतात प्रगतीचे दार नेहमी उघडे असते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन डॉ.रजनीश मिश्रा आणि प्रा.सुचेता, एस.चौधरी यांनी केले.